# सृष्टिज्ञान

**संस्थापक :**
कै.प्राचार्य गो. रा. परांजपे
कै. डॉ. दि. धों. कर्वे
कै. प्रा. स. बा. हुदलीकर

**मार्गदर्शक :**
डॉ. रघुनाथ माशेलकर
डॉ. अनिल काकोडकर
डॉ. विजय भटकर
डॉ. शेखर मांडे

**सल्लागार :**
ले. ज. डॉ. माधुरी कानिटकर (निवृत्त)
डॉ. भूषण पटवर्धन
डॉ. प्रदीप कुरुलकर

**संचालक :**
डॉ. योगेश शौचे
डॉ. मानसी माळगांवकर
डॉ. क. कृ. क्षीरसागर
श्री. र. वि. कुलकर्णी

**संपादक :**
रमेश दाते

**सहसंपादक :**
डॉ. प्रभाकर इंगळे
सत्यजित जोशी

**मुखपृष्ठ मांडणी व सजावट :**
मिलिंद जोशी, अनुपम क्रिएशन्स, पुणे



या अंकाची किंमत : रु. ४०.००
वार्षिक वर्गणी : रु. ४००.००



**पत्रव्यवहाराचा पत्ता :**
'सृष्टिज्ञान', c/o विज्ञान भारती
काशी निवास, सुभाषनगर गल्ली क्र.६,
१२६१ शुक्रवार पेठ, पुणे ४११००२.
फोन नं.: ०२०–२४४७४२९५
ई–मेल : sci.vibha@gmail.com


# संकल्पपूर्तीकडील वाटचाल

११ मे हा तंत्रज्ञान दिवस, इ.स. १९९८ सालच्या पोखरण अणुचाचणीचा स्मरण दिवस, किंबहुना तो एका संकल्पाचा स्मरणदिन म्हणणे अधिक उचित होईल. तो संकल्प प्रत्यक्ष उच्चारला गेला नाही तरी कृतीने दर्शविला गेला होता.

संकल्प होता स्वावलंबनाचा व आत्मनिर्भरतेचा.

नजिकचाच एक काळ असा होता की, भारत म्हणजे मागासलेला, अविकसित, परावलंबी देश असे म्हटले जाई. काहीजणांच्या मनात कदाचित भारत म्हणजे भिकारी अशीही प्रतिमा होती. कुणीही हिणवावे अशी परिस्थिती होती. ब्रिटीशांचे राज्य गेले तरी ब्रिटीशांचे ते आदर्श असे शिकविले गेलेल्यांचा भारतीय समाजात वरचष्मा होता. तर विद्रोही पुरोगामी म्हणजे केवळ ब्रिटीश पध्दतींना विरोध इतकाच मर्यादित अर्थ होता.

आज भारत हा जगाच्या पाठीवर एक महासत्ता होऊ घातलेला देश आहे. विज्ञान व तंत्रज्ञान यांचे जोरावर सर्वच क्षेत्रात भारताने उत्तुंग झेप घेतली आहे. भारताचा जगात दरारा आहे, भारताविषयी मनात आदरयुक्त भीतिही आहे. प्राचिन भारत एकेकाळी सर्वच क्षेत्रात जगात अग्रेसर होता, तेच स्थान लवकरच प्राप्त होईल. अशी लक्षणे दिसत आहेत. या सर्वाचे मूळ होते १९९८ साली संकल्पपूर्तीकडे टाकलेल्या पहिल्या पाऊलाचे वा अणुबॉम्ब चांचणीचे

भारतासारख्या विशाल व वैविध्यपूर्ण भूमीवर शिवाय जेथे स्वातंत्र्य, समता यांचा जयजयकार आहे, जनता दरिद्री व अशिक्षित आहे, तेथे अशी सर्वांगीण प्रगती होणे ही जणू फार मोठी हनुमान उडी आहे या सर्वांगीण प्रगतीचा आढावा घेणे उचित आहे.

कृषी, सिंचनक्षेत्र, पशुपालन, दूध उत्पादन, अन्नधान्य उत्पादन, पारंपारिक व अपारंपारिक ऊर्जाक्षेत्र, नैसर्गिक वायू व तेल क्षेत्र, खनीज संपदा, अवकाश तंत्रज्ञान, परमाणू तंत्रज्ञान, संगणक क्षेत्र, औषध निर्मिती, संरक्षण यंत्रणा, रेल्वे, महामार्ग, सागरी व हवाई दळणवळण, औद्योगिक उत्पादन, जहाज बांधणी, विमान निर्मिती, क्षेपणास्त्र यंत्रणा, दूरसंचार, आर्थिक नियोजन, परराष्ट्रनिती व संबंध,

---


या अंकातील लेख त्या त्या विषयांतील तज्ञांनी लिहिलेले आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

वीजक्षेत्र, युवकांमधील कौशल्यविकास, डिजिटल तंत्रज्ञान अशा सर्वच क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती झाली आहे. सर्वांची साथ व सर्वांचा विकास हा मंत्र प्रत्यक्षात आणला गेला आहे. कृषीक्षेत्रात, सिंचनक्षेत्रात झालेली वाढ, आदिंमुळे सध्या सर्व जगात भारताचा कृषी उत्पादनात दुसरा नंबर आहे. एकेकाळी अन्नधान्य आयात करणारा आपला देश सध्या भुकेल्या जगताचा आधारस्तंभ आहे. गेल्या वर्षीची गहू निर्यात विक्रमी म्हणजे ७० लाख टन (जवळजवळ २.०५ अब्ज डॉलर्सची) होती तर यंदाची अपेक्षा एक कोटी टन निर्यातीची आहे.

इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनांची निर्यात १९१९ चे तुलनेत २०२२–२३ मध्ये ४ पट वाढली आहे. अवकाश तंत्रज्ञानात भारतीय उपग्रहांनी नवनवीन शोध लावले आहेत. तर उपग्रह प्रक्षेपणात भारत जागतीक अग्रणी ठरला आहे. एकाच वेळेस १०० हून उपग्रह प्रक्षेपण करणे तर आपण केलेच, परंतु त्याचबरोबर क्रायोजेनिक इंजिनची निर्मिती केली. आता तर पुनर्वापर करता येणारा प्रक्षेपकही तयार केला आहे.

क्षेपणास्त्रात पृथ्वी, आकाश, त्रिशूल, नाग, अग्नि अशी एक मालिकाच बनविली आहे. पायदळासाठी लागणारी उपकरणे, भूसुरंग, प्रस्फोटके, उच्च ऊर्जापदार्थ तसेच सुरक्षा आणि विश्वासार्हता वाढविणाऱ्या अनेक विकासकामांनी लष्कराला मजबुती आली आहे. तोफखान्यासाठी पिनाक ही बहुउद्देशीय प्रणाली विकसित झाली आहे.

तेजस विमान हे लढाऊ विमान अल्पावधीत जगभर मान्यता मिळवून आज आपण त्याची निर्यातही करू लागलो आहोत. पाणबुड्या निर्मिती, युद्धनौका बांधणी यात भारत स्वावलंबी झाला आहे.

ही प्रगतीची घोडदौड औषधनिर्मिती क्षेत्रातही सुरू आहे. कोविड महामारीवर स्वदेशीय लसही अत्यंत अल्प किंमतीतील व तरीही परिणामकारक अशी विकसित झाली इतकेच नव्हे तर जगभरातून तीचा स्वीकार झाला. लसटोचणी मध्ये तर २८० कोटींहून अधिकचा पल्ला गाठून आपण विश्वविक्रम केला आहे.

आपल्याला उच्च दर्जाचे संगणक तंत्रज्ञान मिळू नये यासाठी धडपडलेल्या प्रगत राष्ट्रांच्या नाकावर टिचून आपण महा संगणक बनविला. माहिती तंत्रज्ञान, माहिती नियंत्रण व हाताळणी यातही आपण अग्रेसर आहोत. तर्कशुद्ध विचार पद्धती यात भारत जागतिक नेतृत्व करीत आहे.

युवकांचे महत्व लक्षात घेऊन युवा कौशल्यविकास, तसेच क्रीडाकौशल्य विकासात आता भारताचे महत्वाचे स्थान आहे.

या साऱ्याचे परिणाम राजनीतिवरसुद्धा उमटले. आज सर्व प्रमुख जागतिक समस्यांवर उपाय शोधताना भारताचे मत विचारात घेतले जाते. एवढेच नव्हे तर भारतावर विसंबून राहता येईल असा विश्वास निर्माण झाला आहे.

अर्थातच श्रेय विज्ञान व तंत्रज्ञानाला नाही, तर प्रखर देशभक्तीने भारलेले, निःसार्थी व प्रामाणिक नेतृत्व हे या सर्व प्रगतीमागचे खरे कारण आहे. भारत माझा देश आहे, भारत माझी माता आहे असा नुसता पोकल शब्दघोष नाही तो धगधगता अंगार या आत्मनिर्भरतेचे कारण आहे.

या आत्मनिर्भरते मागच्या प्रेरणास्त्रोताला मनःपूर्वक शतशः प्रणाम.

**रमेश दाते**

sci.vibha@gmail.com

SRISHTIDNYAN (RNI No. 21321/1973 Dt. 11 Oct. 20 100)

'सृष्टिज्ञान' हे मासिक मालक विज्ञान भारती पुणे यांचे साठी मुद्रक व प्रकाशक रमेश दाते यांनी प्रतिमा ऑफसेट, कोथरुड इंडस्ट्रियल एरिया, कोथरुड, पुणे ४११०३८. येथे छापून विज्ञान भारती १२६१ शुक्रवार पेठ, काशी निवास, सुभाषनगर, गल्ली क्र.६, पुणे ४११००२. येथे प्रसिध्द केले.